**आर.सी.सी.क्र.१५६/२०२४**
**सरकार वि. स निलेश वामन**
**नि.क्र.३६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – नंदकुमार हिरामन निकरट,

वय - ३५ वर्षे , व्यवसाय – मिस्त्री,

राहणार – दरेवाडी, ता.जि. अहिल्यानगर.

सरतपासणी सहा**.** सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**–

मी फिर्यादी सुनीता संजय वामन यांना ओळखतो. त्या माझ्या सासुबाई आहेत. मी सर्व आरोपींना ओळखतो ते माझे नातेवाईक आहेत.

०२. घटना ही साधारण दोन ते तीन वर्षांपुर्वी साधारण रात्री ०८.०० वाजण्याच्या सुमारास आखतवाडे गावात घडली होती. त्यावेळी विहिरीच्या पाण्यावरुन आरोपी व आमच्या दरम्यान किरकोळ वाद झाला होता. त्या व्यतिरिक्त काही घडले नव्हते. मी दगडावरुन घसरुन पडल्यामुळे मला शरिरावर मुकामार लागला होता. पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नव्हती. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता.

***(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).***

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.०४.२०२४ रोजी रात्री १०.३०

वाजण्याच्या सुमारास मी, घरासमोर बसलो असातांना सर्व आरोपी घरासमोर आले व माझी सासु सुनिता हिला विहिरीतील पाण्याशी काहीही एक संबंध नाही असे म्हणुन आरोपी निलेश याने माझ्या सासुच्या उजव्या पायावर काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी व माझा मेव्हणा सुरेश हा भांडण सोडविण्यासाठी गेलो असता आम्हास आरोपी अभिषेक, पंकज व मनिषा यांनी त्यास लाथाबुक्याने मारहाण केली व कोयत्याने हातपाय तोडुन टाकु अशी आम्हाला धमकी दिली. साक्षीदारास जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन माझ्या सांगण्याप्रमाणे तो नमुद करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचा व आरोपी दरम्यानचा वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.यु.लांडे यांचेमार्फतः-

०४. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति -

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.04.04 18:00:52 +0530

ठिकाण - शेवगाव.
दिनांक- ०४.०४.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं.३ शेवगाव.